# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.07.2025** **वार- रविवार**

---

**अजित पवार**

हिंजवडी इथल्या राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला अधिक चालना देण्यासाठी आणि परिसरातील नागरिकांच्या समस्या लवकरात लवकर सोडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयानं काम करावं अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिल्या. हिंजवडी भागात पावसामुळे साचणारं पाणी, स्वच्छतेचा प्रश्न, वाहतुकीच्या समस्या सोडवण्यासाठी तात्काळ नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी, असं पवार म्हणाले. हिंजवडी आयटी पार्क परिसरातील समस्या आणि पुणे मेट्रो लाईन तीन च्या कामाची पाहणी केल्यानंतर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

**मंगलप्रभात लोढा**

राज्यातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणं ही राज्य शासनाची जबाबदारी आहे; या युवकांना स्वयंरोजगाराचं साधन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही कौशल्य, रोजगार विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज पुण्यात दिली. कौशल्य विभाग, पुणे पोलीस आयुक्तालय आणि हरीभाई व्ही देसाई महाविद्यालयानं संयुक्तपणे आयोजित केलेल्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ते बोलत होते.

**एमआयटी**

प्रशासकीय सेवेत कार्य करताना मानवतेला प्राथमिकता देऊन जनकल्याणाचं कार्य करावं असं मुंबईचे माजी पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी म्हटलं आहे. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या स्कूल ऑफ गव्हर्नमेंटनं, केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षेतील यशस्वी उमेदवारांच्या सत्कार सोहळ्याचं आयोजन नुकतच पुण्यात केलं होतं; त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून फणसाळकर बोलत होते.

**शाळांची पायाभूत चाचणी**

राज्यातील सरकारी शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, आणि खासगी अनुदानित शाळांमधील दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या तीन नियतकालिक मूल्यांकन चाचण्या घेतल्या जाणार आहेत. याबाबतचं परिपत्रक विद्या प्राधिकरणाचे संचालक राहुल रेखावार यांनी जारी केलं आहे. येत्या 6 ते 8 ऑगस्ट या कालावधीत प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा इंग्रजी या विषयांची ही पायाभूत चाचणी घेतली जाईल.

**गांधी दर्शन शिबिर**

महात्मा गांधीजींचे विचार जागतिकीकरणालाही मानवतेचा चेहरा देऊ शकतात; असं प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी आज पुण्यात केलं. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलातर्फे आयोजित 'गांधी दर्शन' शिबिराच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. ज्येष्ठ लेखक आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ डॉ. अच्युत गोडबोले यांनी यावेळी "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजावरील परिणाम" या विषयावर अत्यंत समर्पक मांडणी केली.

**आशुतोष जावडेकर**

युवा लेखक, कवी, व्याख्याते डॉ. आशुतोष जावडेकर यांचा आज रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काव्य प्रतिभा पुरस्काराने गौरव करण्यात आला. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आलं. ज्येष्ठ विचारवंत लेखक, कवी डॉ. राजा दीक्षित यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. माणसाच्या मनातील द्वंद्वाची उत्तरं जेव्हा साहित्यातून सापडतील तेव्हाच ते साहित्य अधिक प्रभावी ठरेल, असं प्रतिपादन डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी केलं.

**स्वच्छता**

शहर स्वच्छतेसाठे पुणे महापालिकेच्या ताफ्यात चार अत्याधुनिक रोड स्विपिंग मशीन दाखल झाल्या आहेत. या व्हॅक्युम ऑपरेटेड रोड स्वीपर मशीन असून केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संस्थेच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्या तयार करण्यात आल्या आहेत. या मशिनमध्ये रस्त्यांबरोबरच पदपथ, सायकल मार्ग, कचरा कुंड्या, दुभाजक स्वच्छ करण्य़ाची सुविधा आहे.

**पुणेमनपा**

पुण्यातील गंगाधाम चौक ते आई माता मंदिर रस्त्यावरील तीव्र उतार कमी करण्यासाठी ९ कोटी १६ लाख रुपयांच्या निविदेला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. या रस्त्याची लांबी ६०० मीटर असून त्यापैकी ५०० मीटर अंतरावरच्या रस्त्यावरचा उतार कमी केला जाणार आहे.

**पीसीएमसी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'हरित सेतू' उपक्रमाअंतर्गत निगडी प्राधिकरण परिसरात "किड्स सायकल डे" हा उपक्रम आज पार पडला. ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयाचे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सायकलवरून ३ किलोमीटरचा मार्ग पार केला. शहरातल्या विविध रस्त्यांचं निरीक्षण केलं, रेखाचित्रं काढली, आणि आपल्या भावनाही बोलून दाखवल्या.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. पावसाने उघडीप दिल्याने फळभाज्यांची आवक वाढली असून घेवडा, शेवगा आणि लसूण यांच्या भावात घट झाली.

सर्वच पालेभाज्यांच्या भावातही घसरण झाली. फळ बाजारात मात्र तेजीचं वातावरण असून फुल बाजारात मंदीचं वातावरण आहे.

**संजय देशमुख निधन**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख यांचं आज मुंबईत हिंदुजा रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झालं. त्यांच्या निधनाबद्दल प्रशासन, राजकीय तसंच पत्रकारिता क्षेत्रातील अनेकांनी शोक व्यक्त केला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण होतं. उद्याही आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. पुण्याच्या घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशाराही देण्यात आला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**